SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists
Estd : 1962
NAAC `A` Grade
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

# परिपत्रक

**विषय - सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था व स्वायत्त संस्थेमध्ये शिकविल्या जाणा-या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी विद्यापीठाचे संलग्नीकरण असल्याचे प्रमाणपत्राबाबत.**

**शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्हयातील संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांमधील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी विद्यापीठाचे संलग्नीकरण बाबतची माहिती विद्यापीठाच्या** www.unishivaji.ac.in **या संकेतस्थळावर Affiliation → Affiliation T–2 'Information/Lists' या लिंकवर उपलब्ध आहे. याबाबत प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयाचे अभ्यासक्रम, विषय, प्रवेशक्षमता, तुकडी इ. बाबतची माहिती तपासून त्यामध्ये जर काही दुरुस्ती असल्यास त्याबाबत दि. ०१/०६/२०२० पूर्वी पुष्ठी करणा-या कागदपत्रासह विद्यापीठ कार्यालयास कळवावे.**

तसेच विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार शासन मान्यता व विद्यापीठाचे संलग्नीकरण असलेल्या अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार सदरचे प्रमाणपत्र सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था/स्वायत्त संस्था यांनी प्रत्येक वर्षी विद्यापीठाकडून घ्यावयाचे असून सदर प्रमाणपत्रासाठी विद्यापीठाने विहित केलेले खालीलप्रमाणे शुल्क दि. ५ जून, २०२० पूर्वी विद्यापीठात जमा करणे आवश्यक आहे. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत प्रमाणपत्राचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. **तसेच सदर प्रमाणपत्र सर्व महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयाच्या प्रवेश माहितीपुस्तिकामध्ये समाविष्ट करणे अनिवार्य असेल याची नोंद घ्यावी.**

पदवी व पदव्युत्तर स्तरावरील संलग्नीकरण मान्यता असलेल्या अभ्यासक्रमांचे विषय व पाठयक्रमांच्या प्रमाणपत्राचे शुल्क खालीलप्रमाणे आहे.

१. प्रथम प्रमाणपत्र देतेवेळी रु.५००/- शुल्क आकारण्यात येईल.
२. पुढील वर्षासाठी प्रमाणपत्र देतेवेळी जर संलग्नीकरण मान्यताप्राप्त अभ्यासक्रमात बदल असेल तर रुपये २००/- शुल्क आकारण्यात येईल.
३. प्रमाणपत्रात काही बदल नसेल तर रुपये १००/- शुल्क आकारण्यात येईल.

**संलग्नीकरण प्रमाणपत्र मागणी करीताच्या सोबत जोडलेल्या प्रस्तावाच्या नमुना अर्जासोबत खालील बाबींची पुर्तता करावी.**

**टिप :-**
**१) मागील वर्षाच्या प्रमाणपत्रांची साक्षांकित प्रत.**
**२) ज्या अभ्यासक्रमास विद्यापीठाकडून निरंतर संलग्नीकरण मान्यता प्राप्त झाली आहे त्या मान्यता पत्राची साक्षांकित प्रत.**
**३) नवीन महाविद्यालय/विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/शासन मान्य अतिरिक्त तुकडी यांच्या शासन मान्यता व विद्यापीठाचे प्राथमिक संलग्नीकरण प्राप्त झालेल्या मान्यता पत्राची साक्षांकित प्रत.**
**४) शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी विद्यापीठाने ज्या अभ्यासक्रमांना/पाठयक्रमांना नुतनीकरण/नैसर्गिक विस्तारास मान्यता दिली आहे त्या पत्राची प्रत.**
**५) सोबत जोडलेल्या अर्जामधील महाविद्यालयास मंजुर प्रवेशक्षमता, प्रवेशित विद्यार्थी व संबंधीत तुकडी/अभ्यासक्रमाच्या शासन मान्यता याबाबतची आधारभूत कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.**

Sd-

उपकुलसचिव
संलग्नता/टी-२ विभाग

संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/१३३
दि. २८/०५/२०२०
प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था व स्वायत्त संस्था.

# प्रस्तावाचा नमुना

संदर्भ -

प्रति,
मा. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय - महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या पाठ्यक्रमांचे संलग्नीकरण प्रमाणपत्र मिळण्याबाबत...

संदर्भ - शिवाजी विद्यापीठ परिपत्रक संदर्भ क्र.१३३

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी आमच्या महाविद्यालयामधील खालील अभ्यासक्रमांना विद्यापीठाचे संलग्नीकरण प्राप्त आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **१** | **संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव व पत्ता :-** | **ता.** | **जि.** |

| **अ. क्र.** | **अभ्यासक्रमाचे नाव** | **कालावधी** | **भाग** | **शासनमान्य मंजूर तुकडी** | | **मंजूर विद्यार्थी संख्या** | | **प्रवेशित विद्यार्थी (शैक्षणिक वर्ष २०१९-२०)** | | **शासन मान्यता संदर्भ क्र.** | **विद्यापीठ मान्यता संदर्भ क्र.** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनुदानित | विनाअनुदानित | अनुदानित | विनाअनुदानित | अनुदानित | विनाअनुदानित | | |
| १ | बी.ए. | ३ वर्षे | १/२/३ | | | | | | | | |
| २ | बी.कॉम. | ३ वर्षे | १/२/३ | | | | | | | | |
| ३ | बी.एस्सी. | ३ वर्षे | १/२/३ | | | | | | | | |
| ४ | इतर अभ्यासक्रम (M.A., M.Com, M.Sc. CoC, PG Diploma, etc) | --- | --- | | | | | | | | |

| | |
|---|---|
| २. | **अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) सांकेतांक-** |
| ३. | **महाविद्यालय शहरी/ग्रामीण- आहे.** |
| ४. | **महिला महाविद्यालय असल्यास - होय/ नाही** |
| ५. | **स्वायत्त(Autonomous) संस्था/महाविद्यालय आहे/नाही** |
| ६. | **महाविद्यालय शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित** |
| ७. | **अनुदानित असल्यास महाविद्यालयास अनुदान देणारा शासन विभाग-** |
| ८ | **प्रस्तावासोबत जोडलेली कागदपत्रे -** |
| i) | मागील वर्षाच्या प्रमाणपत्रांची साक्षांकित प्रत |
| ii) | ज्या अभ्यासक्रमास विद्यापीठाकडून निरंतर संलग्नीकरण मान्यता प्राप्त झाली आहे त्या पत्राची साक्षांकित प्रत |
| iii) | नवीन महाविद्यालय/विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/शासन मान्य अतिरिक्त तुकडी यांच्या शासन मान्यता व विद्यापीठाचे प्राथमिक संलग्नीकरण प्राप्त झालेल्या मान्यता पत्राची साक्षांकित प्रत. |
| iv) | महाविद्यालयास निरंतर संलग्नीकरण असल्यास त्याबाबतचे विद्यापीठाचे पत्र |
| v) | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी विद्यापीठाने ज्या अभ्यासक्रमांना/पाठ्यक्रमांना नुतनीकरण/नैसर्गिक विस्तारास मान्यता दिली आहे त्या पत्राची प्रत. |

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र मिळावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्राचार्य,
(सही व शिक्का)

**टिप - उपरोक्त नमुना अभ्यासक्रमांकरिता मंजुर प्रवेश क्षमता, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेशित विद्यार्थी व संबंधीत अभ्यासक्रमाच्या शासन मान्यता आणि विद्यापीठ मान्यता याबाबतची योग्य माहिती भरणे आवश्यक आहे.**